वृत्तपत्राचे नांव- सुराज्य
दिनांक- ९/९/१६

# राज्य मानवी हक्क आयोग २० पासून सोलापूर दौऱ्यावर

सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग येत्या २० ते २३ सप्टेंबर असे चार दिवस सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात सोलापूर, उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यातील केसेसची सुनावणी होणार आहे.

आयोगाचे अध्यक्ष मा. न्या. एस.आर. बन्नुरमठ, सदस्य एम. अे. सईद, सदस्य भगवंतराव मोरे यांचा दौऱ्यात समावेश आहे. मंगळवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजून ५.० मिनिटांनी आयोगाचे सदस्य मुंबईहून रेल्वेने डाक बंगल्यावर येणार असून दिवसभर त्यांचा वेळ राखीव आहे. बुधवार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून आयोगाकडून सोलापूर, उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यातील केसेसचे

▶▶ पान ९ वर...

कामकाज होणार आहे. गुरुवार, २२ सप्टेंबर रोजी आयोगाचे सदस्य सोलापूर विद्यापीठातील मानवी हक्क आणि मानवीय समाज या विषयावरील कार्यशाळेस उपस्थित राहणार आहेत. शुक्रवार, २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नागरिकांसाठी आयोजित जनजागृती कार्यक्रमास आयोगाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता मानवी हक्काबाबत संवेदनशीलता कार्यक्रम या विषयावर शासकीय अधिकाऱ्यांची बैठक आयोगाकडून घेतली जाणार असून रात्री आयोग मुंबईला परतणार आहे.